कोरोना विषाणू प्रादुर्भाव प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत विभागातील अधिकारी / कर्मचारी यांची विभागातील उपस्थिती नियंत्रित ठेवण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :- संकीर्ण -२०२०/प्र.क्र. १५६/ प्रशा-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २० एप्रिल, २०२०.

संदर्भ:- १) महसूल व वन विभाग, अधिसूचना क्र- DMU/२०२०/CR-९२/Dis,M-१,
दि.२५-०३-२०२०, दि. १५-०४-२०२० व दि. १७-०४-२०२०.
२) सामान्य प्रशासन विभाग, शा.नि. क्र. समय- २०२०/ प्र.क्र.३५/का.१८ (रवका)
दि.१८-०३-२०२०, दि. २०-०३-२०२०, दि. २३-०३-२०२० व दि.१८-०४-२०२०.

शासन परिपत्रक:-

शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना कोरोना विषाणूचा ( COVID-१९ ) प्रसार व विषाणूचा संसर्ग होऊ नये म्हणून महसूल व वन विभागाच्या संदर्भाधीन दि.१५-०४-२०२० च्या अधिसूचनेनुसार सद्य:स्थितीत केंद्र व राज्य शासनाने लॉक डाऊनचा कालावधी दि. ०३-०५-२०२० पर्यंत वाढविलेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या दि. १७ एप्रिल, २०२०च्या अधिसूचनेतील अ.क्र. १९ नुसार तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १८-०४-२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दि. २० एप्रिल, २०२० ते दि. ०३-०५-२०२० या कालावधीत विभागातील सर्व सह सचिव / उप सचिवांची १०० % उपस्थिती अनिवार्य केलेली असून अन्य अधिकारी व कर्मचारी संवर्गात १० % इतकी उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे.

२. उपरोक्त सुचनांनुसार विभागातील सह सचिव तसेच उप सचिव यांनी लॉक डाऊनच्या कालावधीमध्ये कार्यालयात उपस्थित रहावे. तसेच त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांना कामकाजाच्या आवश्यकतेनुसार १० टक्क्याच्या मर्यादेमध्ये आळीपाळीने ( Rotation Basis ) बोलावून शासकीय कामकाज सुरळीत सुरु राहील यांची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयातील सूचनांचे काटेकोरपणे पाल करण्याची दक्षता घ्यावी.

याशिवाय वेळोवेळी उदभवलेल्या तातडीच्या प्रसंगी अपर मुख्य सचिव ( सार्वजनिक बांधकाम), सचिव (रस्ते ) व सचिव ( बांधकामे ) यांनी दिलेल्या निर्देशानुसार उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी विभागातील कामकाज तातडीने पार पाडणे आवश्यक राहील.

Scanned by CamScanner

३. सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

मृ. सं. देशपांडे

( मृ. सं. देशपांडे )
अवर सचिव ( प्रशासन )

प्रति,

अपर मुख्य सचिव ( सा.बां. )यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव (रस्ते) यांचे स्वीय सहायक , सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव (बांधकामे) यांचे स्वीय सहायक , सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व सह सचिव / उप सचिव /अवर सचिव/कक्ष अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व कर्मचारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
निवडस्ती.

Scanned by CamScanner